पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१
ई मेल- sp.pune.r @mahapolice.gov.in.
(आस्थापना शाखा)

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पोलीस शिपाई भरती २०२४-२५
-: उमेदवारांकरीता सुचना :-

****

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या घटकातील पोलीस शिपाई पदाच्या ६९ रिक्त पदांकरिता ८०९ उमेदवार लेखी परिक्षेसे पात्र झाले असून त्या उमेदवारांची दिनांक १५.०३.२०२६ रोजी सकाळी ११:०० वा " MIT ADT University, Vishwrajbaug. Tal- Haveli. District - Pune. Pin ४१२२०२" येथे परिक्षा घेणार आहे. सदर लेखी परिक्षेच्या अनुषंगाने पोलीस शिपाई पदाकरिता लेखी परिक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी दिनांक १५.०३.२०२६ रोजी सकाळी ठिक ०६:०० वा. उपस्थित रहावे.

उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

1. मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवाराकडे असतील तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. तसेच, स्वत:चे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेले फोटोची दोन प्रत सोबत आणावी.
2. प्रवेश पत्र आणि पासपोर्ट साईज फोटो हया शिवाय इतर कोणतीही वस्तू / साहित्य सोबत घेऊन येउ नये. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.
3. लेखी परीक्षा ९० मिनिटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.
4. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापूर्वी दिलेल्या वेळेत पोहचणे अपेक्षित आहे.
5. परीक्षा केंद्रावर उमेदवारास बॉल पॉइंट पेन व लेखनासाठी पॅड पुरविण्यात येतील.
6. प्रस्तुत उत्तरपत्रीका ही कार्बनलेस (Carbonless OMR Sheet) या प्रकारातील असून, दोन प्रतीत असेल. परीक्षेचा कालावधी संपेपर्यंत उत्तरपत्रीकेचा भाग-2 मूळ उत्तरपत्रीके पासून कोणत्याही परिस्थितीत वेगळा करू नये.
7. OMR Sheet वरील सूचनांचे काटेकोर पालन करवे.
8. परीक्षा कालावधी संपल्यानंतर उत्तरपत्रीका पर्यवेक्षकांकडे जमा करण्यापूर्वी उत्तरपत्रीकेचा भाग-2 मूळ उत्तरपत्रीकेपासून विहित केलेल्या ठिकाणी व्यवस्थीतपणे फाडून वेळगा करावा. परीक्षेनंतर उत्तरपत्रीकेचा भाग-2 सोबत घेउन जाण्याची उमेदवारांना परवानगी देण्यात आली आहे.
9. एकापेक्षा अधिक वर्तुळे छायांकित अशा उत्तरास गुण दिले जाणार नाही.
10. OMR Sheet वर कोणतेही चिन्ह नमुद करू नये / नाव लिहू नये / खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये, असे आढळून आल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.
11. उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्याच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
12. परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.
13. उमेदवारांनी परिक्षेला येताना बॅग / मोबाईल / इतर मौल्यवान वस्तू परिक्षा केंद्रावर घेवून येवू नये.
14. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन / डिजीटल डायरी / मायक्रोफोन / कॅलक्युलेटर / नोट पॅड / नोटस् पुस्तके / ईअरफोन / हिअरिंग एड डिव्हाईस / स्मार्ट वॉचेस, स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहीत्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहीत्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच कसुरदाराविरुद्ध महाराष्ट्र स्पर्धा परिक्षा (अनुचित मार्गास प्रतीबंध) अधिनियम 2024 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
15. अंतिम निकाल लागल्यानंतर उमेदवारांना लेखी परिक्षेस प्राप्त गुणांसंदर्भात काही शंका / तक्रार असल्यास त्या संदर्भात निकालानंतर २४ तासाच्या आत उमेदवारांनी घटक प्रमुख (भरती अध्यक्ष) यांच्या नावाने रु. २००/- शुल्कासह हजर राहून लेखी निवेदन सादर करावे. २४ तासानंतर येणाऱ्या उमेदवाराच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

(संदीप सिंह गिल्ल) भा.पो.से
पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण.
तथा अध्यक्ष,
पोलीस भरती निवड मंडळ.

Scanned with OKEN Scanner